वाचले

1. १) माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कलम ५ (१)
2. २) आदेश क्र.नासुके/१/कावि/७०५/२०१३ दि.०६/११/२०१३
3. ३) आदेश क्र.नरवि/कावि/प्रशा/५४४/२०१४ दि.१४/११/२०१४
4. ४) नगररचना व विकास विभागाकडील दि.२०/११/२०१४ चा प्रस्ताव.
5. ५) मा.आयुक्तसो यांनी मान्य केलेला नागरी सुविधा केंद्र विभागाकडील दि.१६/१२/२०१४ चा प्रस्ताव.

---

ISO 9001 : 2008 Certification
प्राप्त महानगरपालिका

माहितीचा
अधिकार

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
नागरी सुविधा केंद्र.
क्र.नासुके/१/कावि/22/२०१५
दिनांक 13/०१/२०१५

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५
जन माहिती अधिकारी पदनिर्देशित करणेबाबत. . .
(नगररचना व विकास विभाग)

आदेश

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ५(१) व १९ (१) मधील तरतूदीनुसार वाचले क्र.२ च्या आदेशान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणाच्या विविध विभागांसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित करण्यात आले आहे. नगररचना व विकास विभागासाठी जन माहिती अधिकारी म्हणून नगररचनाकार यांना आणि प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून उपसंचालक, नगररचना यांना पदनिर्देशित करणेत आले आहे.

नगररचना व विकास विभागाकडील वाचले क्र. ३ चे कार्यालयीन आदेशाव्दारे नगररचनाकार व उपअभियंता यांचेकडे कामकाज सोपविण्यात आलेले आहे. नगररचना व विकास विभागाकडील माहिती अधिकार विषयक कामकाज जलदगतीने होण्यासाठी व विलंब टाळण्याच्या दृष्टीने नगररचनाकार यांचेसह उपअभियंता यांना माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित करणेबाबत वाचले क्र.४ अन्वये उपसंचालक, नगररचना यांनी प्रस्तावित केले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ५ (१) नुसार, प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण, त्याच्या अखत्यारीतील सर्व प्रशासकीय युनिटांमध्ये किंवा कार्यालयांमध्ये आवश्यक असतील तेवढया जास्तीत जास्त अधिका-यांना, जन माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित करील.

सबब, नगररचना व विकास विभागाकडील माहिती अधिकार विषयक कामकाज जलदगतीने पार पाडावे आणि नागरिकांना माहिती शिघ्रतेने उपलब्ध व्हावी या उद्देशासाठी, नगररचना व विकास विभागाकडील कामकाज वाटप आदेश आणि अधिनियमातील तरतूदी या बाबीं विचारात घेऊन, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, नगररचना व विकास विभागासाठी नगररचनाकार यांचेसह उपअभियंता यांना जन माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित करणेस या आदेशान्वये मान्यता देत आहे.

२...

संबंधित अधिकारी यांची प्रशासकीय बदली झाल्यास / पद रिक्त असल्यास, बदली झालेल्या किंवा अतिरिक्त पदभार सोपविलेल्या अधिकारी / कर्मचा-यांनी त्या पदास पदनिर्देशित केल्याप्रमाणे कामकाज करावे. कामकाज बदलामुळे किंवा अन्य कारणांमुळे माहिती अधिकारी यांचे पद रिक्त राहिल्यास उपसंचालक,नगररचना यांनी माहितीच्या अधिकाराची व्यवस्थित अंमलबजावणी होण्यासाठी उपाययोजना व कार्यवाही आपल्या स्तरावर करावी.

(राजीव जाधव)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,

विभागप्रमुख / संबंधित अधिकारी,
नगररचना व विकास विभाग.
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत,

ई गव्हर्नन्स विभाग.

२/- प्रस्तुत आदेशाच्या अनुषंगाने मनपा वेबपोर्टलवरील माहिती अद्ययावत करावी.

प्रशासन अधिकारी,
नागरी सुविधा केंद्र
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.